अपिलेट कमीटी



अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. ३/२०२१
दिनांक : ६/११/१८.

पुणे शहरातील रस्ता/पदपथांवरील सर्वेक्षणात आढळून आलेल्या व संगणकीय नोंदणी झालेल्या फेरीवाल्यांचे योग्य त्या ठिकाणी पुर्नवसन करणेसाठी जागा निश्चिती करणे व त्यांचेकरीता आकारणी करण्याचे दैनंदिन शुल्क निश्चित करणेकामी मा. महापौर, पुणे म.न.पा. यांचे नियंत्रणाखाली ॲपिलेट कमिटी नेमून विषयांकित प्रकरणी दि. १४/९/२०१७ रोजी सदर कमिटीची बैठक मा. महापौर, पुणे मनपा यांचे दालनात घेण्यात आली.

सदर बैठकीमध्ये खालीप्रमाणे अधिकारी/पदअधिकारी उपस्थित होते.
मा. सौ. मुक्ता टिळक, महापौर, पुणे महानगरपालिका
मा. श्रीनाथ भिमाले, सभागृह नेता
मा. अरविंद शिंदे, पक्षनेते राष्ट्रीय काँग्रेस पक्ष, पुणे महानगरपालिका
मा. सौ. अश्विनी लांडगे, गटनेत्या ए.आय.एम.आय.एम.
मा. दीपक मानकर, सभासद, पुणे महानगरपालिका
मा. प्रमोदनाना भानगिरे, सभासद, पुणे महानगरपालिका
मा. कुणाल कुमार, महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका
मा. शीतल तेली-उगले, अति. महा. आयुक्त (ज)
मा. प्रशांत वाघमारे, शहर अभियंता, पुणे महानगरपालिका
मा. सतिश कुलकर्णी, उप आयुक्त (मालमत्ता व व्यवस्थापन)
मा. माधव जगताप, उप आयुक्त (अतिक्रमण)

सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार कार्यवाही करणेबाबत मा. महापौर पुणे म.न.पा यांनी खालीलप्रमाणे आदेश दिलेले असून त्याची संपूर्ण कार्यवाही एक महिन्यात करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत.

सर्वप्रथम मागिल सभा दि. ३०/६/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करण्यात आले.

| अ.क्र. | विषय | झालेली चर्चा व घेतलेले निर्णय | घेतलेले निर्णयानुसार कार्यवाही करणारे खाते |
|---|---|---|---|
| १ | क्षेत्रिय कार्यालय निहाय नोंदणीकृत वर्गवारी अ,ब,क मधील फेरीवाल्यांचे करीता पुर्नवसन करावयाच्या पहिल्या टप्प्यातील जागा निश्चित करणे. (तद्नंतर पुनर्वसन जागा शिल्लक राहिल्यास/उपलब्ध झाल्यास वर्गवारी ड व इ मधील फेरीवाल्यांचा पुर्नवसन करणे कामी विचार करणे) | पुर्नवसनाच्या जागा निश्चित झाल्या आहेत का? तसेच जागेस मान्यता घेतली आहे का? असा प्रश्न मा. **नगरसेवक अरविंद शिंदे यांनी विचारणा केलेली आहे.** **मा. उप आयुक्त अतिक्रमण** – पुर्नवसनाच्या जागा निश्चित झाल्या आहेत, जागेस क्षेत्रीय कार्यालयांच्या प्रभागा समितीमध्ये मान्यता घेण्यात आलेली आहे व शहर फेरीवाला समितीमध्ये मान्यता घेण्यात आलेली आहे. मुख्य सभेची मान्यता घेण्यात आलेली नाही. असे मा. **पक्षनेते अरविंद शिंदे यांनी विचारणा** | सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालये |

| | | | |
|---|---|---|---|
| | | केलेली आहे. त्यावर उपआयुक्त (अतिक्रमण) यांनी मा. मुख्य सभेने दिलेल्या उपसुचनेनुसार मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली अपीलेट कमिटी नेमावी व जागा निश्चिती व दर निश्चिती करण्याचा अधिकार अपिलेट कमिटीत असावा. याबाबत पुर्नवसनाच्या पदपथ व ॲमेनिटी स्पेस अशा एकूण २८८ जागा निश्चित केलेबाबत सांगितले. अ+ श्रेणीतील शुल्क वसूल करण्याची ठिकाणे मा. उप आयुक्त यांनी सभेपुढे सादर केली त्यास ॲपिलेट कमिटीने मंजुरी दिली. त्याचप्रमाणे क्षेत्रीय कार्यालयाने निश्चित करुन दिलेली पुर्नवसन ठिकाणे व दर निश्चित करणेत आला. | |
| २ | ५ क्षेत्रीय कार्यालयांकडून जागा व दर निश्चितीचा प्रस्ताव सादर करणेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.<br>क्षेत्रीय कार्यालयांची नावे<br>१) नगर रोड २) विश्रामबागवाडा रोड ३) भवानी पेठ ४) धनकवडी ५) बिबवेवाडी | या ५ क्षेत्रीय कार्यालयांपैकी विश्रामबागवाडा, भवानी पेठ, बिबवेवाडी या ३ क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रभाग समितीच्या बैठका झालेल्या असून उर्वरीत नगररोड, धनकवडी या क्षेत्रीय कार्यालयांच्या प्रभाग समितीच्या बैठका घेण्यात याव्यात. या विषयावर चर्चा होऊन उर्वरीत दोन क्षेत्रीय कार्यालय झोननिहाय दरनिश्चिती व पुर्नवसनाच्या जागा याबाबतची माहिती ॲपिलेट कमिटीला देण्यात आली. ॲपिलेट कमिटीने सर्व क्षेत्रीय कार्यालयांचे प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. | सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालये |
| ३ | दिवसेंदिवस पुण्यामध्ये वाढत जाणा-या अतिक्रमणाबाबत. | दिवसेंदिवस पुण्यामध्ये अतिक्रमण वाढत आहे, या वाढणा-या अतिक्रमणाला कुठेतरी आळा बसला पाहिजे, तसेच पुर्नवसनासाठी ५ ग्रुप तयार करण्यात आलेले आहेत. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयनिहाय पुर्नवसनाचे काम सुरु झालेले आहे. यासाठी दर निश्चित करण्यात आलेले आहेत, त्या दरांनुसार त्यांचेकडून वसुली होणे अपेक्षित आहे, तसेच खूप व्यवसायिक हे रस्ता/पदपथांवर कोणतेही शुल्क न भरता व्यवसाय करत आहेत. किती व्यवसायिक कोणतेही शुल्क न भरता व्यवसाय करत | सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालये |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आहेत यांची संख्या देण्यात यावी व सर्व्हे करण्यात आलेला आहे त्याची संख्या देण्यात यावी. याबाबत मा. **गटनेते अरविंद शिंदे यांनी विचारणा केलेली आहे.**<br>**मा. उप आयुक्त अतिक्रमण** – २८, २४५ लोकांची प्रत्यक्ष जागेवर नोंदणी झालेली आहे. तसेच आतापर्यंत ज्यांची नावे डबल झालेली आहे, तसेच व्यवसायबदल असेल अ वर्गवारी तून ड/ई मध्ये टाकण्यात आले असेल किंवा काही व्यवसायिक नाव येणेपुरते तात्पुरते व्यवसाय करत असतील तर त्यांचे नाव तपासून वगळू शकतो. याद्या तपासणी करणेकरीता ज्या प्रभाग समित्या झालेल्या आहेत त्यामध्ये संबंधित क्षेत्रीय कार्यालयाकडील महापालिका सहाय्यक आयुक्त, अतिक्रमण निरीक्षक व त्या भागातील/प्रभागातील सभासद असे एकत्रित बसून तपासणी करतील व ती नावे अंतिम करतील, त्यांचेच आपण पुर्नवसन करणार आहोत. जी नावे ड्युब्लीकेट असतील ती तपासून आपण वगळू शकतो. | |
| ४ | नो-हॉकर्स झोनमधील व्यवसायिकांचे पुर्नवसन करणेबाबत. | संपुर्ण शहरामध्ये नो-हॉकर्स झोन ठरविल्यानंतर तेथील व्यवसायिकांचे आपण कुठे पुर्नवसन करणार आहोत? **अशी विचारणा मा. महापौर यांनी केलेली आहे.** यापुर्वीच मा. मुख्य सभेने ४५ रस्ते व १५३ चौक नो-हॉकर्स झोन म्हणून ठराव केलेला आहे. २८८ जागा ह्या क्लिअर आहेत का?<br>**मा. उप आयुक्त (अतिक्रमण)**– ह्या जागा रस्त्यांपैकीच तात्पुरत्या जागा आहेत, शहरातील रस्ते अरुंद असल्याने कोणत्याही जागा उपलब्ध नाहीत. काही व्यवसायिक आहे त्याच ठिकाणी ठेवावे लागणार आहेत. पण काही ठिकाणी ट्रॅफीक विभागाकडून वाहतूकीस अडथळा होत असलेबाबतचा अभिप्राय देण्यात आलेला आहे, त्यामुळे त्यांना दुसरीकडे हलविणार आहोत. तसेच जे रस्ते पुर्णपणे नो हॉकर्स होतील अशा रस्त्याची व चौकाची माहिती संकलित करुन प्रस्ताव सादर करावा. | सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालये |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | नो-हॉकर्समधील व्यवसायिकांचे पुर्नवसन कसे करायचे? | **मा.महापौर**-नो-हॉकर्समधील व्यवसायिकांचे पुर्नवसन कसे करायचे? तसेच पुर्नवसन व कारवाई करणेसाठी आपलेकडे पुरेसा कर्मचारीवर्ग उपलब्ध आहे का?<br>**मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)** - अतिक्रमण विभागाकडे शेडयुल पदी १७२ जागा रिक्त आहेत. याबाबत भरती प्रक्रीया सुरु करण्याचे आदेश सामान्य प्रशासन विभागास देण्यात आलेले आहेत. मा. महापालिका आयुक्त यांनी ४५ रस्ते व १५३ चौक येथे शक्य असेल तेथे नोंदणीकृत फेरीवाला व्यावसायिक यांचे पुर्नवसन मा. मुख्य सभेची मान्यता घेवून करण्यात येईल, असे सांगितले. | सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालये<br>उप आयुक्त सामान्य प्रशासन |
| ६ | पुर्नवसन करताना जागा निश्चिती व जागा हस्तांतरण करण्याचा अधिकार कोणाकडे असावा अशी पक्षनेते अरविंद शिंदे यांनी विचारणा केली. | **मा. महापालिका आयुक्त** - पुर्नवसन करताना जागा निश्चिती करण्याचा अधिकार ॲपिलेट कमिटीची मान्यता घ्यावी. तसेच जागा हस्तांतर (Allotment) करण्याचा अधिकार प्रशासनास आहे. हा परवाना ५ वर्षाकरीताच राहणार आहे. ५ वर्षानंतर सदर परवाना पुन्हा नुतनीकरण करावा लागणार आहे.<br>**मा. महापौर** - परवाना (लायसन्स) दुस-यांच्या नावावर करता येते का?<br>**मा. उपआयुक्त (अतिक्रमण)** यांनी याबाबत मा. मुख्य सभेमध्ये ठराव मंजूर झाल्याप्रमाणे तडजोड हस्तांतर शुल्काप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल, असे सांगितले. | सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालये |
| ७ | प्रलंबित बायोमेट्रीक सर्व्हेक्षण | **मा. नगरसेवक श्री. भिमाले** - बायोमेट्रीक सर्व्हेक्षण करणेसाठी जे अर्ज प्रलंबित आहेत, ते पुर्ण करण्यात यावे. पेपरला एक जाहिरात देऊन एखादी तारीख देऊन सर्व कागदपत्रे मागवून सर्व प्रलंबित अर्ज निकाला काढण्यात यावे. जे या तारखेनंतर अर्ज येणार आहेत ते घेतले जाणार नाहीत.<br>**मा. उप आयुक्त (अतिक्रमण)** - याबाबत जाहिर प्रकटन देऊन प्रलंबित आंहेत ते अर्ज निकाली काढता येईल. | सर्व महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालये<br>उप आयुक्त (अतिक्रमण) |

**आयत्या वेळेचे विषय**

१) नो-हॉकर्स झोनमधील जे स्टॉल आहेत त्यांना नोटीसा गेल्या पाहिजेत. १ महिन्याच्या आत स्थलांतरीत होणेबांबत सूचना देऊन कारवाई करावी.

२) फूड स्टॉलसाठी वेगळे पॅटर्न राबवायचा आहे. ॲमेनिटी स्पेसच्या १० जागा मा. नगर अभियंता यांनी उपलब्ध करुन द्याव्यात.

३) जे रस्त्यावरचे उदा. लक्ष्मी रोड, बाजीराव रोड वगैरे या ठिकाणचे नोंदणीकृत फेरीवाला व्यवसायिक जर हलविता येणार नसेल तर त्यांना त्याचा ठिकाणी ठेवण्यात यावे.

४) ४५ नो-हॉकर्स रस्ते व १५३ चौकातून १० रस्ते व १० चौक निवडण्यात यावेत.

५) ज्या व्यवसायिकांकडून २०० रु प्रति दिवसाला घेणार आहोत, त्यांना तशा सोयी-सुविधा पुरविण्यात याव्यात. सार्वजनिक टॉयलेटची सोय केली पाहिजे.

याबाबत केलेल्या कार्यवाहीचा आढावा पुढील बैठकीत घेणेत येईल याबाबत संबंधीतांनी दक्षता घ्यावी, वरील निर्णय घेऊन बैठक संपविण्यात आली.

11.10.17

(माधव जगताप)
उप आयुक्त
अतिक्रमण/अनधिकृत
बांधकाम निर्मुलन विभाग
पुणे महानगरपालिका

(शीतल तेली-उगले)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

(कुणाल कुमार)
आयुक्त
पुणे महानगरपालिका

(मुक्ता टिळक)
महापौर
पुणे महानगरपालिका

प्रतः-

मा. महापालिका सहाय्यक आयुक्त
सर्व क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका.
पुणे महानगरपालिका

पुढील कार्यवाहीसाठी...